श्री. पावडे मंदार श्रावणा, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) प्रा.आ.केंद्र शेडी ता अकोले यांना पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद

सामान्य प्रशासन विभाग-१

जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/४५/२०२५

अहिल्यानगर दिनांक /०३/२०२५ 08/04/2025

वाचा:- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा(शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम ३

२. वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले. यांचेकडील पत्र जा.क्र. आरोग्य/आस्था/क्र.सहा गु दा/२९१/२०२५ दिनांक १२/०३/२०२५

३. वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य धामणगाव घाट ता अकोले. यांचेकडील पत्र जा.क्र आरोग्य विभाग/आर्थिक/१७/२०२५ दिनांक १२/०३/२०२५

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/ ६०३/२०२५ दिनांक १३/०३/२०२५

५. वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले. यांचेकडील पत्र जा.क्र. आरोग्य/आस्था/क्र.सहा गु दा/२९३/२०२५ दिनांक १२/०३/२०२५

ज्या अर्थी श्री पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले येथे कार्यरत असताना त्यांनी शासकीय रक्कमेचा अपहार करणे, अनाधिकृत गैरहजर रहाणे, अशाप्रकारचे गैरवर्तन केलेले आहे. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीचे उल्लघंन करणारी आहे. श्री. पावडे हे जिल्हा परिषद कर्मचारी असुन त्यांनी सदैव निरपवाद, सचोटीने व कर्तव्य परायण असणे आवश्यक आहे. तथापि कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग झालेला आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ३ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे उक्त श्री. पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले, यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतुन निलंबीत करीत आहे.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश आमलात राहील तेवढया कालावधीत श्री पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले, यांचे मुख्यालय .............. जि. प. ल. पा. जामखेड ............ येथे राहिल.

आणि श्री पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले, यांना ......... उपविभागीय जलसंधारण अधिकारी जामखेड ......... यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेडी ता अकोले, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले, यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल तसेच ते निंलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

..२

..२..

निलंबनाचे कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री. पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले यांनी सादर करावे.

निलंबानाचे कालावधीत श्री पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जामखेड हे करतील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202505090400075 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 08-05-2025 14:28:13
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री पावडे मंदार श्रावण, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी ता अकोले
द्वारा व प्रत:- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र शेंडी ता अकोले

प्रत:-मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.अहमदनगर
प्रत:- उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प. लपा जामखेड
प्रत:- निवड नस्ती